महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१४/प्र.क्र.१७०/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २ जून, २०१५

वाचा -

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र-२००९ /(६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२.

२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/ स्वयंअर्थ/२०१४/१५-१६/३०१/२३३, दिनांक १४ जानेवारी, २०१५.

प्रस्तावना -

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, व विहित पध्दतीने परवानगी देणे, यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) पारित केला असून सदर अधिनियम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अंमलात आला आहे. तसेच, सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छूक असणा-या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी व नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता नविन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जा वाढ करणे याकरिता दिनांक ३१ जुलै, २०१४ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. सदर प्रस्तावांची छाननी करुन पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय-

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अन्वये सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या एकूण ४२३६ प्रस्तावांपैकी १०८५ शाळांचे प्रस्ताव पात्र ठरतात. त्यानुसार या सोबतच्या **विवरणपत्रामध्ये** दर्शविलेल्या १०८५ शाळांना ,शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून, नवीन शाळा स्थापन करणे आणि विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरीता याद्वारे शासन **परवानगी** देत आहे .

२. शासन परवानगी/शाळांचा दर्जावाढ करण्याच्या अटी व शर्ती -

२.१ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.**

२.२ पात्र ठरलेल्या संबधित शाळांच्या व्यवस्थापनांनी **अधिनियम,** २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे **परवानगी (इरादा पत्र)** देण्यात येत आहे.

अ) ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

ब) ज्या व्यवस्थापनास सन २०१५-१६ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

क) **सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई** इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून **परवानगी** (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार ना-हरकत **प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत** (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

२.३ सोबतच्या **विवरणपत्रातील** यादीनुसार परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ** शाळांना i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** (सन २०१३ चा ०१) मधिल सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील

२.४ सदर आदेश सर्व व्यवस्थापन/संस्थांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व शिक्षण उपसंचालक यांची राहील.

२.५ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

२.६ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

२.७ **यु-डायस डाटा-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती

भरताना, "*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०६०३१०३०४१२८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2015.06.03 13:35:23 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व महानगर पालिकांचे आयुक्त
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
५. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
८. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
९. सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.
१०. संबंधित प्रशासन अधिकारी, महानगर पालिका/नगर परिषद/नगर पालिका
११. निवडनस्ती (एसएम २).

| अ. क्रं. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १९१ | पुणे | चिल्ड्रन स्कील डेव्हलपमेंट फाऊंडेशन, मु.पो.कडाचीवाडी, गणेशनगर, चाकण, ता.खेड, जि.पुणे, पिन - ४१०५०१ | जॉयस इंग्लिश मेडीयम स्कुल, चाकण, मु.पो.कडाचीवाडी, गणेशनगर, चाकण, गट नं.१४१ ता.खेड, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी |
| १९२ | पुणे | "स्वयंभु" ६/२६, सर्वे नं.४३, वडगाव बु., ता.हवेली, जि.पुणे, पिन - ४११०४१ | गुरुकुल इंटरनॅशनल स्कुल, आंबेगांव बु., ता.हवेली, जि.पुणे. | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |
| १९३ | पुणे | मथुराबाई रामभाऊ नरखेडे मेमोरिअल ट्रस्ट, B-१/१६, रागदरी सोसायटी, डी.पी.रोड, औंध, पुणे - ४११००७ | पुणे पब्लिक स्कुल, कातरखडक, पो. खांबोली, ता.मुळशी, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |
| १९४ | पुणे | महाराणी सईबाई सेवाभावी संस्था, मु.पो.भिकोबानगर, पणदरे, ता.बारामती, जि.पुणे, पिन - ४१३११० | जिजाऊ ज्ञान मंदिर, भिकोबानगर (पणदरे), ता.बारामती, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी |
| १९५ | पुणे | अंजुमन ई-ताहेरी, सर्वे नं.५२, टिळेकर नगर, कोंढवा, कात्रज रोड, कोंढवा, ता.हवेली, जि.पुणे | एम.एस.बी.एज्युकेशनल इंस्टीटयुट, सर्वे नं.५२, टिळेकर नगर, कोंढवा, कात्रज रोड, कोंढवा, ता.हवेली, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी |
| १९६ | पुणे | मुळा एज्युकेशन सोसायटी, सोनई, ता.नेवासा, जि.अहमदनगर, पिन - ४१४१०५ | ऑईस्टर सीबीएसई स्कुल सेक्शन फीफटींन अंडर सी.बी.एस.ई.पॅटर्न, ताथवडे, ता.मुळशी, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी |
| १९७ | पुणे | परिवर्तन शिक्षण संस्था, सर्वे नं. ३११/२, शिवनगरी, ससानेनगर, हडपसर, पुणे, ता.हवेली, जि.पुणे, पिन. ४११०२८ | एस.आर.व्हीक्टरी स्कुल, होळकरवाडी, ता.हवेली, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक ते माध्यमिक | इंग्रजी |
| १९८ | पुणे | द वेस्टर्न इंडिया झोनल असेंब्ली ऑफ दि मार थोमा चर्च, मार थोमा सेन्टर, सेक्टर - १०/A, प्लॉट नं. - १८, वाशि, नवी मुंबई, ता.जि.ठाणे, पिन - ४००७०३ | सेंट थॉमस इंग्लिश मिडियम स्कुल, वडावली, ता.मावळ, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक ते माध्यमिक | इंग्रजी |
| १९९ | पुणे | राजा छत्रापती मेमोरिअल ट्रस्ट, मु.पो. करंदी, ता.शिरुर, जि.पुणे, पिन. ४१२२०८ | जे.जे.इंटरनॅशनल स्कुल, मु.पो. करंदी, ता.शिरुर, जि.पुणे, पिन- ४१२२०८ | नवीन शाळा | प्राथमिक ते माध्यमिक | इंग्रजी |
| २०० | पुणे | रुपीनगर शिक्षण प्रसारक मंडळ, रुपीनगर तळवडे, हवेली, पुणे - ४११०६२ | ज्ञानदिप इंग्लिश मिडियम स्कुल, रुपीनगर, तळवडे, हवेली, पुणे | नवीन शाळा | प्राथमिक ते माध्यमिक | इंग्रजी |
| २०१ | पुणे | शिया मदरसा ट्रस्ट, मु.पो.जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे, पिन - ४१०५०२ | युनिटेड इंग्लिश स्कुल, जुन्नर - नारायणगाव रोड, मु.पो.जुन्नर, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी |
| २०२ | पुणे | डेक्कन एज्युकेशन सोसायटी, फर्ग्युसन कॉलेज कॅम्पस, पुणे - ४११००४ | डी.ई.एस.इंग्लिश मिडियम स्कुल, शिरुर, प्लॉट नं.३५६ अॅन्ड ३५७, शिरुर, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी |
| २०३ | पुणे | डिग्नीटी एज्युकेशन सोसायटी, मु.पो.केतकावळे, ता.पुरंदर,जि.पुणे, पिन - ४१२२०५ | ग्रव्हीटी इंग्लिश मिडियम स्कुल, मु.पो.केतकावळे, ता.पुरंदर,जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी |
| २०४ | पुणे | ऐश्वर्या फौंऊडेशन, लक्ष्मीनिवास, हरपळे नगर, फुरसुंगी, ता.हवेली, जि.पुणे, पिन - ४१२३०८ | E.M.H.इंग्लिश मिडियम स्कुल, लक्ष्मीनिवास, हरपळे नगर, फुरसुंगी, ता.हवेली, जि.पुणे, पिन - ४१२३०८ | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी |

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2015.06.03 13:39:03 +05'30'

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१६/प्र.क्र.६९/एसएम- २**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १७ जून, २०१६

<u>वाचा -</u>

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र-२००९ /(६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२.
२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/ स्वयंअर्थ/२०१५-१६/माध्य-क(३०१)/२९८१, दिनांक ५ मे, २०१६

<u>प्रस्तावना -</u>

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, व विहित पध्दतीने परवानगी देणे, यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) पारित केला असून सदर अधिनियम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अंमलात आला आहे. तसेच, सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छूक असणा-या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता नवीन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरिता दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. सदर प्रस्तावांची छाननी करुन पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय-</u>

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अन्वये सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता प्राप्त झालेल्या एकूण ५३०१ प्रस्तावांपैकी

३७४३ शाळांचे प्रस्ताव पात्र ठरतात. त्यानुसार या सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या ३७४३ शाळांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून, नवीन शाळा स्थापन करणे आणि विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरीता याद्वारे शासन परवानगी देण्यात येत आहे.

**२. शासन परवानगी/शाळांचा दर्जावाढ करण्याच्या अटी व शर्ती -**

२.१ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.**

२.२ पात्र ठरलेल्या संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने **अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

**अ)** ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

**ब)** ज्या व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

**क) सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई** इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून **परवानगी** (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत (N.O.C.)** प्रमाणपत्र देईल.

२.३ सोबतच्या विवरणपत्रातील यादीनुसार परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळांना i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील

२.४ सदर आदेश संबधित संस्थांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

२.५ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची

खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

२.६ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

२.७ **यु-डायस डाटा:-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"***स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा***" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता **" स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१६०६१७१७१८५०९४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=dc74b0493b4979ad0aa76763f873c23fa35ecb44970562d4aa14a832b6357e54, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2016.06.18 13:45:18 +05'30'

(रा. ग. गुंजाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
५. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
८. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
९. शिक्षण निरीक्षक(पश्चिम/उत्तर/दक्षिण) बृहन्मुंबई
१०.सर्व संबधित प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपालिका
११.निवडनस्ती (एसएम-२).

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियम) अधिनियम 2012 अंतर्गत कलम 7(1) अन्वये नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी सन 2016-17 या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी दिलेल्या शाळांच्या नावाची यादी

शासन निर्णय क्रमांक:एसएफएस-1016/प्र.क्र.69/एसएम-2, दिनांक 17.6.2016 चे सहपत्र

| अ.क्र | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | शाळेचे नाव व पत्ता | नवीन शाळा/ दर्जावाढ | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार | शाळेचे माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | मुंबई (उत्तर) | श्री नारायण मंदिरा समिती श्री नारायण नगर, प.ल.लोखंडे मार्ग, चेंबूर, मुंबई -400 089 | श्री नारायण गुरु सेंट्रल स्कूल श्री नारायण नगर, प.ल.लोखंडे मार्ग, चेंबर मुंबई - 400 089 | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक (इयत्ता १ ली. ते ५ वी.) | इंग्रजी |
| २ | मुंबई (उत्तर) | शिवाजी शिक्षण संस्था, डॉक्टर अंकुश शंकर गावडे मार्ग, पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई - ४०० ०७५ | शिवाजी शिक्षण संस्थेचे कला वाणिज्य विज्ञान कनिष्ठ रात्र महाविद्यालय डॉ. अंकुश शंकर गावडे मार्ग, पंतनगर, घाटकोपर (पूर्व) मुंबई - ४०० ०७५ | नवीन शाळा | राज्य मंडळ | उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता ११ वी. ते १२ वी.) | इंग्रजी |
| ३ | मुंबई (उत्तर) | जन सेवा संघ गुलाम मोहहमद बिल्डिंग, नौरोजी हिल रोड, डोंगरी मुंबई ४०० ००९ | कुमारी कस्तुरी विदयालय अॅण्ड ज्युनिअर कॉलेज दत्त मंदिर रोड, भांडुप (प), मुंबई | दर्जावाढ | राज्य मंडळ | माध्यमिक ला जोडून उच्च माध्यमिक कला (इयत्ता ११ वी. ते १२ वी.) | इंग्रजी |
| ४ | मुंबई (उत्तर) | श्री छत्रपति शिवाजी शिक्षण संस्था ज्ञानसंपदा हाय स्कूल,शिवाजी नगर ,गोवंडी ,मुंबई ४०००४३ | ज्ञानसंपदा इंग्लिश स्कूल ज्ञानसंपदा हायस्कूल, ज्ञानसंपदा हायस्कूल मार्ग, शिवाजीनगर, गोवंडी, मंबई - ४०००४३. | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते माध्यमिक (इयत्ता १ ली. ते १० वी.) | इंग्रजी |
| ५ | मुंबई (उत्तर) | कुर्ला एज्युकेशन आणि वेलफेअर ट्रस्ट अल-फलाह इंग्लिश स्कूल एल. आय. जी. कॉलनी, विनोबा भावे नगर, कुर्ला (प) मंबई 400 070. | अल-फलाह इंग्लिश स्कूल एल. आय. जी. कॉलनी, विनोबा भावे नगर, कुर्ला (प), मुंबई 400 070. | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते माध्यमिक (इयत्ता १ ली. ते १० वी.) | इंग्रजी |
| ६ | मुंबई (उत्तर) | श्री राम पंडागळे एज्युकेशन ट्रस्ट बंधुप्रेम सीएचएस, पलॉट -728, डी-6, सेक्टर -7, चारकोप, कांदीवली (प.) | ऑक्सफर्ड हायस्कूल आणि कनिष्ठ महाविदयालय पवई आय आय टी बॉम्बे | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता १ ली. ते १२ वी.) | इंग्रजी |
| ७ | मुंबई (उत्तर) | बाल विकास शिक्षण संस्था वाडीया इस्टेट, बैल बाजार, कुर्ला (प), मुंबई 400 070. | शिशु विकास मंदिर इंग्लिश मिडीयम स्कूल वाडीया इस्टेट, बैल बाजार, कुर्ला (प), मुंबई 400 070. | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी.) | इंग्रजी |
| ८ | मुंबई (उत्तर) | सोमैया विदयाविहार सोमैया भवन, ४५/४७, काला घोडा , फोर्ट, मुंबई 4000001 | द सोमैया स्कूल सोमैया कॅपस, विदयाविहार (पू), मुंबई 400 077 | दर्जावाढ | सी.बी.एस.ई | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी. ते १० वी.) | इंग्रजी |
| ९ | मुंबई (उत्तर) | पुणे विद्यार्थी गृह १७८६ , सदाशिव पेठ , पुणे ४१११०३० | विद्याभवन हाय स्कूल व कनिष्ठ विद्यालय सी . टी.एस नं २१८, नाथ पै नगर ,घाटकोपर पूर्व , मुंबई ७७ | दर्जावाढ | राज्य मंडळ | माध्यमिक ला जोडून उच्च माध्यमिक वाणिज्य (इयत्ता ११ वी. ते १२ वी.) | इंग्रजी |
| १० | मुंबई (उत्तर) | महाराष्ट्रीय शिक्षण संस्थारू नो. १४, पराग विद्यालय , शिवाजी तलाव ,भांडूप (वेस्ट) मुंबई. ४०००७८. | पराग इंग्लिश स्कूल अॅण्ड ज्युनिअर कॉलेज पराग एज्युकेशनल कॅपस, शिवाजी तलाव, भांडुप (प), मुंबई 400 078. | दर्जावाढ | राज्य मंडळ | माध्यमिक ला जोडून उच्च माध्यमिक वाणिज्य (इयत्ता ११ वी. ते १२ वी.) | इंग्रजी |
| ११ | मुंबई (उत्तर) | पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट के/ओ रेडिएंत ट्रेद्वेस्त प्रायवेट लिमिटेड, १५, जे. एन. हेरादिया मार्ग, दुभाष हाउस, बेलार्द एस्टेत, मुंबई, ४००००१ | पवार पब्लिक स्कूल 7 वा मजला, ड्रिम्स मॉल जवळ, एल. बी. एस. रोड, भांडुप (प), मुंबई 400 077 | दर्जावाढ | राज्य मंडळ | माध्यमिक ला जोडून उच्च माध्यमिक विज्ञान (इयत्ता ११ वी. ते १२ वी.) | इंग्रजी |
| १२ | मुंबई (उत्तर) | बंटस संघ मुंबईबंटारा भवन, भंडारी इस्टेट, बंटारा भवन मार्ग, कुर्ला (पू), मुंबई 400 070. | बंटस संघ एस. एम. शेटटी इंटरनॅशनल कनिष्ठ महाविदयालय जल वायू विहार समोर, हिरानंदानी गर्डेस, पवई, मुंबई ४०० ०७६ | दर्जावाढ | आय.बी | माध्यमिक ला जोडून उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता ११ वी. ते १२ वी.) | इंग्रजी |
| १३ | मुंबई (उत्तर) | नाहर सिटीजन्स वेलफेयर एसोसिएशनपी के रोड , मुलुंड(प), मुंबई-४०००८० | धनवल्लभ इंग्लिश हाईस्कूल पी के रोड, मुलुंड, मुंबई-४०००८० | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक ते माध्यमिक (इयत्ता १ ली. ते १० वी.) | इंग्रजी |

| | | | | शाळा/ दर्जावाढ | संलग्नता | | माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १०३४ | पुणे | डेक्कन एज्युकेशन सोसायटी पुणे फर्ग्युसन कॉलेज कॅम्पस पुणे ४११००४. | डी ई एस इंग्लिश मेडीअम स्कूल शिरूर प्लॉट नंबर ३५६ व ३५७ , शिरूर , ता. शिरूर जि. पुणे . | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता ६ वी ते १२ वी ) | इंग्रजी |
| १०३५ | पुणे | बालाजी शिक्षण प्रसारक मंडळमु. पो. जातेगाव बु. ता.शिरूर जि.पुणे | बालाजी उच्च प्राथमिक विद्यालयरामलिंग रोड शिरूर | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी ) | मराठी |
| १०३६ | पुणे | श्री संत शिरोमणी तुकाराम महाराज प्रतिष्ठानमु पो झारगडवाडी ता बारामती जि पुणे | संत तुकाराम महाराज प्राथमिक विद्यालयमु पो डोर्लेवाडी ता बारामती जि पुणे 413102 | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी ) | मराठी |
| १०३७ | पुणे | चाकण शिक्षण मंडळ चाकणआगरवाडी रोड, चाकण ता.खेड जि.पुणे ४१०५०१ | नावोन्मेश प्राथमिक विद्यामंदिर चाकणआगरवाडी रोड चाकण ता.खेड जि.पुणे ४१०५०१ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी ) | मराठी |
| १०३८ | पुणे | श्री छत्रपति संभाजी राजे शिक्षण संस्थामु पो चांबळी ता. पुरंदर जि. पुणे ४१२३०१ | हिलटोप उप्पर प्रायमरी स्कूल चांबळी मु. पो चांबळी ता. पुरंदर जि. पुणे ४१२३०१ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी ) | इंग्रजी |
| १०३९ | पुणे | श्री गजानन महाराज एजुकेशन सोसायटी गोन्हे बुद्रुकगट न. २४२, गोन्हे बुद्रुक, तालुका हवेली, जिल्हा पुणे, पिन-४११०२५. | नोब्ले ब्लूमिंग बड्स स्कूलगट न. २४२, गोन्हे बुद्रुक, तालुका- हवेली, जिल्हा- पुणे, पिन-४११०२५. | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी ) | इंग्रजी |
| १०४० | पुणे | सिद्धी एज्युकेशन सोसायटी आणि रिसर्च फौंडेशन मु.पो.- येणेरे , ता.- जुन्नर जि., पुणे . पिन -४१०५०२ . | इंडियन इंग्लिश मेडियम स्कूलमु.पो.- येणेरे , ता.-जुन्नर जि., पुणे . पिन - ४१०५०२ . | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी ) | इंग्रजी |
| १०४१ | पुणे | एस ए.एज्युकेशन ट्रस्टतुन्गागाव , साकी विहार रोड , मुंबई | शिवाजीराव वाळूंज इंग्लिश मेडियम स्कूलमु.पो. आव्हात , ता. खेद ,जि. ,पुणे पिन ४१२४०२ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी ) | इंग्रजी |
| १०४२ | पुणे | एकलव्य शिक्षण संस्था राजगुरुनगर डाक बंगलामुक्काम पोस्ट राजगुरुनगर डाक बंगला तालुका खेड जिल्हा पुणे | विद्यासागर इंग्लिश मेडियम स्कूल राजगुरुनगरमु पोस्ट राजगुरुनगर डाक बंगला तालुका खेड जिल्हा पुणे | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी ) | इंग्रजी |
| १०४३ | पुणे | तुळजाभवानी एजुकेशन सोसायटीमु.पो.शिरसटवाडी ता.इंदापूर जि.पुणे | तुळजाभवानी इंग्लिश मिडीयम स्कूलमु.पो.निमगाव केतकी | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी ) | इंग्रजी |
| १०४४ | पुणे | साई विद्या प्रतिष्ठानबालाजीनगर, मेदनकरवाडी, चाकण, ता - खेड जि - पुणे ४१० ५०१ | होली एंजल्स इंग्लिश मेडीअमभोसे, वडगाव घेनंद रोड, चाकण ता - खेड जि - पुणे ४१० ५०१ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी ) | इंग्रजी |
| १०४५ | पुणे | आर्च एंजल एज्युकेशन फौडेशन स.नं /७ /२ /२ मांजरी बु. ता. हवेली.जि.पुणे कुंजीर वस्ती | कुंजीर पब्लिक स्कूलस.नं /७ /२ /२ मांजरी बु. ता. हवेली.जि.पुणे कुंजीर वस्ती पिन -४१२३०७ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी ) | इंग्रजी |
| १०४६ | पुणे | कन्नड संघ पुणेस.न. ३६, सी.डी.स.स. चा जवळ, गणेशनगर, एरंडवणे, पुणे - ४११०३८. | कावेरी पब्लिक स्कुलस.न.: ३५, वडगाव शिंदे रस्था, लोहगाव, पुणे- ४११०४७. | दर्जावाढ | आय.सी.एस.ई | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी ) | इंग्रजी |
| १०४७ | पुणे | न्यू एज्युकेशन सोसायटी४४२, सोमवार पेठ , पुणे ४११०११ | एम एच पटेल इंग्लिश मेडिअम प्री प्रायमरी व प्रायमरी स्कूल ४४२, सोमवार पेठ , पुणे ४११०११ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी ) | इंग्रजी |
| १०४८ | पुणे | फलक एज्युकेशन सोसायटीस .नं.५ /१ अ , लेन २ ,हाउस ७०४ ,भाग्योदय नगर कोंढवा खुर्द ,पुणे ४११०४८ . | ब्राईट फ्युचर स्कूल स.नं ४६ .कोंढवा खुर्द , पुणे ४१०४८ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते | इंग्रजी |

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग**
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१६/प्र.क्र.६९/एसएम-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- १० ऑगस्ट, २०२३

वाचा -

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: एसएफएस-१०१६/प्र.क्र.६९/एसएम-२, दिनांक १७ जून, २०१६.

शासन शुद्धीपत्रक :-

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक शासन निर्णय क्र. एसएफएस-१०१६/प्र.क्र.६९/एसएम-२, दिनांक १७.०६.२०१६ अन्वये डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित डी ई एस इंग्लिश मेडीअम स्कूल शिरूर प्लॉट नंबर ३५६ व ३५७, शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे या शाळेस सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून स्वंय अर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. उपरोक्त शासन निर्णयामधील शाळेच्या मंडळ संलग्नतेमध्ये **"सी.बी.एस.ई."** ऐवजी **"राज्यमंडळ"** असे वाचावे.

२. सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा / दर्जावाढ करण्यास परवानगी देण्याबाबतच्या संदर्भाधीन दिनांक १७.०६.२०१६ च्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती जशाच्या तशा सदर शाळेस लागू राहतील.

३. सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसाच्या आत कळविण्याची जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(विवेक सपकाळ)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

१. आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. महानगरपालिका आयुक्त, पुणे शहर महानगरपालिका, पुणे.
३. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
४. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

५. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
७. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.
८. निवडनस्ती (११५/२३/एसएम २)